RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ७, अंक ३४] सोमवार, डिसेंबर ६, २०२१/अग्रहायण १५, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ४२**

### प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ डिसेंबर २०२१.

### अधिसूचना

**खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक डीएमएफ. ०६२१/प्र.क्र. ५७/उद्योग-९.—खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम,१९५७ (१९५७ चा ६७) मधील कलम ९ ब चे उप-कलम (३) आणि कलम १५ चे उप-कलम (४) आणि कलम १५ ए आणि उक्त अधिनियमातील कलम २० ए अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये केंद्र शासनाने पारित केलेल्या आदेशास अनुसरुन महाराष्ट्र शासन खालीलप्रमाणे जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम,२०१६ मध्ये सुधारणा करीत आहे :—

**१.** सदर नियमास महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, (प्रथम सुधारणा ) २०२१ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, २०१६ (यापुढे सदर नियमास "मुख्य नियम" संबोधले जाईल) मधील नियम ५ च्या उपनियम (१) ते (३) ऐवजी खालीलप्रमाणे उपनियम राहतील :—

(१) प्रतिष्ठान प्रन्यासाचे व्यवस्थापन नियामक परिषदेकडे विहित करण्यात येईल, जी राज्य शासनाकडून नियुक्त केलेल्या सर्व विश्वस्थांची बनलेली असेल. सदर नियामक परिषदेमध्ये अध्यक्ष, सदस्य आणि सदस्य सचिव यांचा अंतर्भाव खालील उपनियमान्वये विहित केल्यानुसार असेल.

(२) संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे नियामक परिषदेचे अध्यक्ष असतील.

(३) संबंधित जिल्हयाचे लोकसभा सदस्य हे नियामक परिषदेचे सदस्य असतील, जर संबंधित जिल्ह्यात एकापेक्षा अधिक लोकसभा सदस्य असतील तर असे सर्व लोकसभा सदस्य नियामक परिषदेचे सदस्य असतील. तथापि, सदरचा लोकसभा मतदारसंघ जर एकापेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये येत असल्यास संबंधित लोकसभा सदस्य हे सदर लोकसभा मतदारसंघात अंतर्भूत सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा खनिज प्रतिष्ठांनच्या नियामक परिषदेवर सदस्य असतील.

(३अ) महाराष्ट्र राज्यातील राज्यसभा सदस्य हे ते निवडतील त्या कोणत्याही एका जिल्ह्याच्या जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर सदस्य असतील. त्यासाठी संबंधित राज्यसभा सदस्य ज्या जिल्ह्याच्या जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर सदस्य म्हणून नियुक्ती होण्यास इच्छूक असेल, त्या जिल्ह्याचे नाव शासनाच्या खनिकर्म विभागाच्या सचिव/ प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव यांना कळवतील व संबंधित खनिकर्म विभागाचे सचिव/ प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव हे राज्यसभा सदस्यांनी निवडलेल्या जिल्ह्याच्या संबंधित जिल्हाधिकारी यांना राज्यसभा सदस्यांचे नाव कळवतील.

(३ब) संबंधित जिल्ह्यातील विधानसभा सदस्य हे जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेचे सदस्य असतील.

(३क) विधानपरिषदेचे सदस्य हे त्यांनी निवडलेल्या जिल्ह्याच्या जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेचे सदस्य असतील. संबंधित विधानपरिषद सदस्य हे ज्या जिल्ह्याच्या खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर सदस्य म्हणून नियुक्त होण्यास इच्छुक असतील, त्या जिल्ह्याचे नाव शासनाच्या खनिकर्म विभागाच्या सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांना कळवतील व संबंधित खनिकर्म विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव हे संबंधित विधानपरिषद सदस्यांनी निवडलेल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना संबधित विधानपरिषद सदस्यांचे नाव कळवतील.

(३ड) जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर खालील अधिकारी हे पदसिध्द सदस्य असतील :—

| | | |
|---|---|---|
| (ऐ) | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - पदसिध्द सदस्य |
| (बी) | नगरपालिका/नगरपरिषद/महानगरपालिका यांच्या हद्दीत खाण बाधित क्षेत्र असल्यास सदर स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासकीय प्रमुख | - पदसिध्द सदस्य |
| (सी) | जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी | - पदसिध्द सदस्य |
| (डी) | जिल्हा आदिवासी विकास अधिकारी | - पदसिध्द सदस्य |
| (ई) | जिल्हा आरोग्य अधिकारी | - पदसिध्द सदस्य |
| (एफ) | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद | - पदसिध्द सदस्य |
| (जी) | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | - पदसिध्द सदस्य |
| (एच) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | - पदसिध्द सदस्य |

(३ई) जिल्हा खनिकर्म अधिकारी हे नियामक परिषदेचे पदसिध्द सदस्य सचिव असतील.

**३.** मुख्य नियमांच्या नियम ८ च्या उप-नियम (३) ऐवजी खालील उपनियमाचा समावेश करण्यात येत आहे :—

(३अ) व्यवस्थापकीय समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल,

| | | |
|---|---|---|
| (ऐ) | संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी | - पदसिध्द अध्यक्ष |
| (बी) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - पदसिध्द सदस्य |

| | | |
|---|---|---|
| (सी) जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी | - | पदसिध्द सदस्य |
| (डी) जिल्हा आदिवासी विकास अधिकारी | - | पदसिध्द सदस्य |
| (ई) जिल्हा आरोग्य अधिकारी | - | पदसिध्द सदस्य |
| (एफ) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद | - | पदसिध्द सदस्य |
| (जी) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | - | पदसिध्द सदस्य |
| (एच) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | - | पदसिध्द सदस्य |
| (आय) प्रदूषण नियंत्रण मंडळाचा एक प्रतिनिधी | - | पदसिध्द सदस्य |
| (जे) जिल्ह्यातील खाणपट्टाधारकांपैकी एक प्रतिनिधी | - | सदस्य |
| (के) जिल्ह्यातील सेवाभावी संस्थेचा एक प्रतिनिधी | - | सदस्य |
| (एल) जिल्हा खनिकर्म अधिकारी | - | पदसिध्द सदस्य सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र गुरव,**
शासनाचे सह सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 6th December 2021.

*NOTIFICATION*

MINES AND MINERALS (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1957.

No. DMF-0621/C.R. No. 57/Ind-9.—In exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 9B and sub-section (*4*) of section 15 of the Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957 (67 of 1957), in it's application to the State of Maharashtra and in pursuance to the directions issued by the Government of India under section 20A of the said Act, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Maharashtra District Mineral Foundation (Trust) Rules, 2016, namely :—

**1**. These rules may be called the Maharashtra District Mineral Foundation (Trust) (First Amendment) Rules, 2021.

**2**. In rule 5 of the Maharashtra District Mineral Foundation (Trust) Rules, 2016 (hereinafter referred to as "the principal Rules"), for sub-rules *(1)* to *(3)* the following sub-rules shall be substituted, namely :—

"*(1)* The management of the District Mineral Foundation Trust shall vest in the Governing Council, which shall consist of all the Trustees of the Trust appointed by the State Government. The Governing Council shall consist of the Chairman, members and Member-Secretary as specified in the following sub-rules.

*(2)* The District Collector of the District shall be the Chairman of the Governing Council.

*(3)* The Member of the House of the People (Lok Sabha) in a district shall be the member of the Governing Council.

In case, there are more than one Member of the House of the People (Lok Sabha) in a district, then all such Members of the House of the People (Lok Sabha) in a district shall be the members of the Governing Council. In case, the constituency of one Member of the House of the People (Lok Sabha) falls in more than one district, then the Member of the House of the People (Lok Sabha) shall be a member of the Governing Council of District Mineral Foundation of all such districts.

(*3A*) The Member of Council of States (Rajya Sabha) from a State shall be the member of the Governing Council of District Mineral Foundation of one district selected by them. The Member of Council of States (Rajya Sabha) shall intimate the name of the district selected by them to the Secretary/ Principal Secretary/ Additional Chief Secretary (Mining), Industries, Energy and Labour Department, who in turn shall inform the concerned District Collector.

(*3B*) The Members of Legislative Assembly in the district shall be the members of the Governing Council.

(*3C*) The Members of Legislative Council shall be the members of the Governing Council of the District Mineral Foundation Trust of one district selected by them. The Members of Legislative Council shall intimate name of the district selected by them to the Secretary/ Principal Secretary/ Additional Chief Secretary (Mining), Industries, Energy and Labour Department,, who in turn shall inform the concerned District Collector.

(*3D*) The following officers shall be the *Ex-Officio* Members of the Governing Council:-

| | | |
|---|---|---|
| (*a*) | Chief Executive Officer, Zilla Parishad. | *Ex-Officio* Member. |
| (*b*) | Administration Officer of the Municipal Corporation or Municipal Council, if the mine affected areas are within the limits of Municipal Corporation or Municipal Council. | *Ex-Officio* Member. |

| | | |
|---|---|---|
| (*c*) | District Vocation Training Officer | *Ex-Officio* Member. |
| (*d*) | District Tribal Welfare Officer | *Ex-Officio* Member. |
| (*e*) | District Health Officer | *Ex-Officio* Member. |
| (*f*) | Executive Engineer, Zilla Parishad | *Ex-Officio* Member. |
| (*g*) | District Women and Child Development Officer | *Ex-Officio* Member. |
| (*h*) | General Manager, District Industries Center (DIC) | *Ex-Officio* Member. |

*(3E)* The District Mining Officer shall be the *Ex-Officio* Member-Secretary of the Governing Council.".

**3.** In rule 8 of the principal Rules, after sub-rule (3), the following sub-rule shall be added, namely :—

*"(3A)* The Managing Committee shall consist of the following Members :—

| | | |
|---|---|---|
| *(a)* | The District Collector of the District | Chairman. |
| *(b)* | Chief Executive Officer, Zilla Parishad. | *Ex-Officio* Member. |
| *(c)* | District Vocation Training Officer | Ex-Officio Member. |
| *(d)* | District Tribal Welfare Officer | *Ex-Officio* Member. |
| *(e)* | District Health Officer | *Ex-Officio* Member. |
| *(f)* | Executive Engineer, Zilla Parishad | *Ex-Officio* Member. |
| *(g)* | District Women and Child Development Officer | *Ex-Officio* Member. |
| *(h)* | General Manager, District Industries Center (DIC) | *Ex-Officio* Member. |
| *(i)* | One representative of Pollution Control Board | *Ex-Officio* Member. |
| *(j)* | One representative of Mine Operating Agency or Mine Lessee in the District | Member. |
| *(k)* | One representative of Non-Government Organization's (NGO's) in the District | Member. |
| *(l)* | District Mining Officer | Member-Secretary.". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA GURAV,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.